## निशाणी क्रमांक १७ वरील आदेश

**CNR-MHSN14000835-2023**

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज कोर्ट कमिश्नरची नेमणूक होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. **वादींचे थोडक्यात कथन असे की,**

वादी यांनी प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा निरंतर मनाई व अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरिता केला असून दावा मिळकत ही वादींच्या वडीलोपार्जित मालकी कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीच्या महसूल रेकॉर्ड व सातबारा उतारेस वादी नं. १ व २ यांची संपूर्ण क्षेत्रास मालक व भोगवटादार म्हणून आहे व त्याप्रमाणे वादी त्यात उत्पन्न घेत आहेत. वादी यांचा भू.मा.क्र. ५०९/२ असून प्रतिवादी यांची दावा मिळकतीच्या शेजारी दक्षिण दिशेला लगत त्यांचे मालकीची भू.मा.क्र. ५०९/३ ही मिळकत आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या मिळकतीची चुकीच्या व बेकायदेशीर पध्दतीने मोजणी केली असून ते वादी यांच्या क्षेत्रात दक्षिण बाजूने वारंवार हरकत अडथळा करीत असतात. मुळ गट नं. ५०९ असून वाद मिळकत ही पोटवसला स्वरुपात असून प्रतिवादी यांनी यापूर्वी केलेली केवळ पोट हिश्यापूरतीची भू.मा.क्र. ५०९/३ ची मोजणी मोघमात केल्याचे दिसत आहे. प्रतिवादी यांच्या केवळ पोटहिश्यापुरती अचूक व कायदेशीर हद्दी कायम कायद्याने करता येणार नाही. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीसह संपूर्ण मुळ गट मोजून त्याचे जुने कायम हद्दीचे दगड व खुणा पाहून सर्व टिपण सोडविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मुळ सर्वे नंबर व सर्व पोट हिस्से यांची मापे सोडवून मुळ अभिलेखाप्रमाणे मोजणी झालेस सदर मोजणी योग्य, बरोबर व कायदेशीर होणार

आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचेतील वाद हे कायमस्वरुपी मिटणार असून त्यांचेत अतिक्रमण असलेस ते रेकॉर्डवर येणार आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा कोर्ट कमिशनचा अर्ज मंजूर होणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी २० वर त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले की, वादीचा अर्ज खोटा, लबाडीचा, चुकीचा आहे. वादी यांनी मुळ दावा निरंतर मनाई व अतिक्रमण काढून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वस्तुत: वादी यांचा भू.मा.क्र. ५०९/२ या मिळकतीच्या दक्षिण बाजूस प्रतिवादी यांच्या मालकीची भू.मा.क्र. ५०९/३ ही मिळकत असून सदर प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये यातील वादी यांनी सुमारे ४ आर. क्षेत्रात अतिक्रमण केलेले होते. त्यासंदर्भात वादी यांना प्रतिवादी यांनी समजावून सांगून देखील त्याचा काहीएक परिणाम न झाल्यामुळे प्रतिवादी यांनी मिळकतीशी भूमिअभिलेख कार्यालयामार्फत दि. ११/२/२०१६ रोजी रितसर मोजणी करुन घेतलेली होती व त्यामध्ये वादी यांनी प्रतिवादींच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे स्पष्टपणे दिसून आलेले आहे. सदर अतिक्रमणाचा कब्जा वादी यांनी प्रतिवादी यांना न दिल्याने प्रतिवादी यांनी तहसिलदार शिराळा यांच्याकडे कामकाज दाखल केले होते. त्यानुसार दि. १३/१२/२०२३ रोजी वादी यांनी प्रतिवादी यांच्या मालकीच्या क्षेत्रात केलेले अतिक्रमण काढून त्याचा कब्जा प्रतिवादी यांना त्याच दिवशी कब्जेपट्टी व कब्जेपावतीनुसार मिळालेला आहे.

४. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी तहसिलदार शिराळा यांचेकडे बी.एन.डी. अर्ज नं. १८/१८ चे कामी वादी यांच्या पूर्वाधिका–

यांनी भू.मा.क्र. ५०९/२ या मिळकतीची मोजणी होवून मिळणेकरिता दि. २२/११/२०१८ रोजी भरलेली र.रु. ३०००/– चे चलन दाखल केलेले होते. त्यानुसार वादी यांच्या मिळकतीची यापूर्वी शासकीय मोजणी झालेली असून त्यामध्ये प्रतिवादी यांचे कोणतेही अतिक्रमण केलेले दिसून आलेले नाही. याउलट वादी यांनीच प्रतिवादी यांच्या भू.मा.क्र. ५०९/३ या मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असल्याने सदरच्या मोजणीबाबतची बाब वादी यांनी मे. कोर्टापासून लपवून ठेवलेली आहे. मुळ गट नं. ५०९ ची फाळणी होवून रितसर पोटवसले तयार झाले आहेत व त्याची शासकीय अभिलेखात नोंद देखील झालेली आहे. त्यामुळे मुळ स.नं. ५०९ च्या सर्व पोटवसल्यांची मोजणी करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. केवळ प्रतिवादी यांच्या क्षेत्रात केलेले अतिक्रमण कायदेशीर मार्गाने प्रतिवादी यांना मिळू नये याकरिता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

५. वादींतर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.परदेशी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.शेवडे यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी त्यांचे कथनांनुसार युक्तीवाद केलेला आहे. वादींनी त्यांचे कथनापृष्ट्यर्थ खालीलप्रमाणे न्यायनिवाड्यांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

***1. Ravikumar V/s. Deputy Commissioner, Amritsar & Ors., CWP No. 20384 of 2014 (O & M), Punjab & Haryana High Court.***

***2. Sri. M Narayanappa V/s. State of Karnataka, WP 24882/2017, Karnataka High Court.***

***<u>3. Kashinath Chindhuji Shastri V/s. Haribhau Nathuji Bawanthade, 2004(2)MHLJ722, 15 December 2003.</u>***

६. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांचे भू.मा.क्र. ५०९/२ चे दक्षिणेला प्रतिवादी यांचे मालकीची भू.मा.क्र. ५०९/३ ही मिळकत असल्याचे तसेच तहसिलदार शिराळा यांचे आदेशानुसार मंडळ अधिकारी यांचेसमक्ष मो.र.नं. ११५१ नुसार झालेल्या मोजणीप्रमाणे वादी यांनी दि. १३/१२/२०२३ रोजी प्रतिवादी यांना ४ आर. अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा दिला या बाबी वादातीत नाहीत. वादींनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई व अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला असून वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी केवळ त्यांचे हिश्यापुरतीच मोजणी मोघमात केली असून त्यानुसार अचूक व कायदेशीर हद्दी कायम करता येणार नाहीत. त्याकरिता संपूर्ण मुळ गट नंबर मोजून हद्दीचे दगड व खुणा पाहून टिपण सोडविणे आवश्यक आहे.

७. याउलट प्रतिवादी यांनी मुळ गट नं. ५०९ ची फाळणी होवून रितसर त्याचे पोटवसले तयार झाले असल्याचे व त्या पोट वसल्यांचे शासकीय अभिलेखात नकाशे तयार झाले असल्याचे व त्यामुळे मुळ स.नं. ५०९ च्या सर्व पोट वसल्यांची मोजणी करण्याची आवश्यकता नसल्याचे कथन केले आहे. सर्व पोट वसल्यांची मोजणी करण्याची झालेस संबंधीतांना पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे व त्यांना पक्षकार न करता त्यांचे क्षेत्राची मोजणी करता येणार नाही असे देखील प्रतिवादीतर्फे कथन करण्यात आले.

८. वादी प्रतिवादींची उपरोक्त कथने पाहता त्यांचेदरम्यान हद्दीवरुन वाद असल्याचे स्पष्ट होते. निश्चीतच हद्दीचा वाद असल्यास कोर्ट कमिश्नरची नियुक्ती करता येवू शकते. वादीतर्फे दाखल केलेल्या न्यायनिवाड्यांचे अवलोकन करता त्यामध्ये मिळकतींच्या हद्दीबाबत वाद असल्यास कोर्ट कमिश्नरची नियुक्ती करता येते असा उहापोह करण्यात आलेला आहे. परंतू पुरावा गोळा करण्यासाठी कोर्ट कमिश्नरची नियुक्ती करता येत नाही. प्रस्तुतचे प्रकरणात वादीतर्फे नि.क्र. ५ लगत तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज दाखल करण्यात आला असून तो अद्यापही प्रलंबीत आहे. सदरच्या अर्जाची चौकशी होवून वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत करणे गरजेचे आहे. मात्र वादीने नि.क्र. ५ चा अर्ज न चालविता दिलेला प्रस्तुतचा अर्ज केवळ पुरावा गोळा करण्यासाठी दिलेला असल्याचे स्पष्ट होते. वादी अशा प्रकारे न्यायालयाची मदत घेवून पुरावा गोळा करु शकत नाहीत. त्यामुळे वादीतर्फे दाखल करण्यात आलेले न्यायनिवाडे तुर्तास विचारात घेता येणार नाहीत. एकंदरीत सर्व परिस्थीती पाहता सध्यस्थितीत प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. वादींचा नि.क्र. १७ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-
(व्ही. ए. देसाई)
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.**

शिराळा
दिनांक २२/०२/२०२४

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 22/02/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 22/02/2024 |
| Order uploaded on | : | 23/02/2024 |